नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व नागपूर जिल्हयांमध्ये सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम घेण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**रोजगार हमी योजना**
**शासन निर्णय क्रमांकः** विहीर-२०१६/प्र.क्र.३१/रोहयो-५
नवीन प्रशासकीय इमारत, १६ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०१ नोव्हेंबर, २०१८

**वाचा :-**

१) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः विहीर-२०१६/प्र.क्र.३१/रोहयो-५, दि.११.०९.२०१६.
२) नियोजन विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांकः विहीर-२०१६/प्र.क्र.३१/रोहयो-५, दि.०४.०१.२०१८.
३) विभागीय आयुक्त नागपूर, यांचे पत्र क्रमांकः रोहयो/सि.वि./अ.का.३/कावि-५८९/२०१८ दि.०४.९.२०१८

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन वाचा येथे नमूद दिनांक १९.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये ५ जिल्ह्यांमध्ये सिंचन विहीरींचा धडक कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. विभागाच्या दिनांक ०४.०१.२०१८ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये दिनांक ११.०९.२०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१.७ व परिच्छेद क्र. १.९ मधील मुद्दा क्र. २ मध्ये "कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लाभार्थ्यांनी दिनांक ३०.०६.२०१८ पर्यंत विहीरीचे काम पूर्ण करावे". अशी सुधारणा करण्यात आली. आता दिनांक ३०.०६.२०१८ नंतर सिंचन विहीरींच्या कार्यक्रमास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व नागपूर या जिल्ह्यांमध्ये सिंचन विहीरींच्या धडक कार्यक्रमाअंतर्गत सिंचन विहीरींना "कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लाभार्थ्यांनी ३१

मार्च, २०१९ पर्यंत विहीरीचे काम पूर्ण करण्यात यावे." विहीत मुदतीत सिंचन विहिरी पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

सदर शासन निर्णयास दिनांक ११.०९.२०१६ च्या शासन निर्णयातील नियम, अटी व शर्ती कायम राहतील. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८१११०११४३५२७८५१६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Dr. Pramod Sopan Shinde

Digitally signed by Dr. Pramod Sopan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=86df3b89584863ae114ab9dcc19318acf0e1e94714d4f3f2196a35403313b298, cn=Dr. Pramod Sopan Shinde
Date: 2018.11.14 16:58:46 +05'30'

**(डॉ. प्रमोद शिंदे)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल महोदयांचे खाजगी सचिव.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अप्पर मुख्य सचिव.
३. मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे स्वीय सहाय्यक.
४. मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा यांचे स्वीय सहाय्यक.
५. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
६. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. विभागीय आयुक्त, नागपूर.
८. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. जिल्हाधिकारी, नागपूर,भंडारा,गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदनागपूर,भंडारा,गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.
११. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१२. विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर.
१३. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४. अधिक्षक अभियंता, पाटबंधारे/ अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर.

१५. संचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय/ महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीसाठी)

१६. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,नागपूर,भंडारा,गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.

१७. उपायुक्त (विकास), नागपूर,भंडारा,गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.

१८. प्रधान महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर,

१९. प्रधान महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर,

२०. जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर,गोंदिया, नागपूर.

२१. सर्व उपसचिव/अवर सचिव / कार्यासन अधिकारी(रोहयो), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२२. निवडनस्ती,मग्रारो-५, रोहयो, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.